भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2024 ◐ 36AB 854809

अनुक्रमांक........ दिनांक ८/११/२०२४ रुपये १००

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे........

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र........

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव........ प्रभारी प्राचार्य आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज

संपूर्ण पत्ता........ नागठाणे, ता. व जि. सातारा

हस्ते व्यक्तीचा संपूर्ण नांव........

पत्ता........

TREASURY OFFICE SATARA

- 7 JAN 2025

STAMP HEAD CLERK

(श्री. शेखर रामचंद्र जाधव)
७१, रामाचा गोट, सातारा.
परवाना क्र. २३०१००६
दु. नि. का. सातारा क्र. १
मुद्रांक विक्रेता

मुद्रांक धारकाची / हस्ते व्यक्तीची सही

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा सातारा
## आणि
## आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे तालुका व जिल्हा सातारा

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ही संस्था मराठी साहित्य क्षेत्रातील साहित्यिक, समीक्षक, प्रकाशक यांचे व्यासपीठ असून तिचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे. साहित्य विश्वातील घडामोडी, वाटचालीचा मागोवा घेणे तसेच नवोदित लेखकांना प्रोत्साहित करणे हे कार्य या संस्थेद्वारे केले जाते. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकास करणे हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ध्येय आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे ही उच्च शिक्षण तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी

कार्य करणाऱ्या संस्थापैकी एक महत्त्वाची संस्था आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील संधी उपलब्ध करून देण्यासोबतच मराठी साहित्य आणि भाषा यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रात कारकीर्द घडविण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे हे महाविद्यालयातील मराठी विभागाचे उद्दिष्ट आहे.

विदयार्थ्यांच्या साहित्यिक गुणांचा व लेखन कौशल्यांचा विकास होण्यासाठी विविध विषयांवर चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माध्यमातून प्रथितयश साहित्यिकांचे मार्गदर्शन मिळून विद्यार्थ्यांची लेखनकौशल्ये, सर्जनशीलता यांना चालना मिळून त्यांच्या भावनांची अभिव्यक्ती साहित्याच्या माध्यमातून व्हावी यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेशी होणारा सामंजस्य करार हा अतिशय महत्त्वाचा आहे. मराठी साहित्य परिषद, पुणे शाखा सातारा आणि आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या दोन शाखा आज दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी एकमेकांशी सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दिष्टे**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे आणि विविध विषयांवर लेखन प्रकल्प राबविणे.
२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, कविसंमेलन, साहित्य संमेलन यांचे संयुक्तिकरित्या आयोजन करणे.
३. मराठी साहित्य विश्वातील नामवंत साहित्यिकांशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून त्यांना मार्गदर्शन करणे.
४. नवोदित लेखकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देऊन लेखक आणि साहित्य परिषद, यांना जोडणारा दुवा म्हणून आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजने कार्य करणे.
५. मोडी लिपी तसेच मराठीतील दुर्मिळ हस्तलिखित साहित्य विद्यार्थ्यांच्या मार्फत मिळवून साहित्याच्या मुख्य प्रवाहात सामाविष्ट करणे.
६. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन करणे.

**एकमेकांना साहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. शैक्षणिक संकुलामध्ये साहित्य विषयक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
२. विविध संयुक्त उपक्रम आयोजित करण्यासाठी सहकार्य करणे.
३. नवोदित विद्यार्थ्यांना, लेखकांना साहित्यिक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
४. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विविध उपक्रमांची विदयार्थ्यांना ओळख करून देणे.
५. शासन, साहित्य अकादमी आणि मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ यांचे उपक्रम संयुक्तरित्या राबविणे.

**अटी आणि शर्ती**

१. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी किंवा शिक्षक प्रतिनिधी यांनी सहभागी होणे.
२. एखादा उपक्रम महाविद्यालयाने आयोजित करण्यासाठी तज्ञ साधनव्यक्ती मिळवण्यासाठी साहित्य परिषदेने सहकार्य करणे.

३. सदर सामंजस्य करार आज पासून पुढील पाच वर्षांसाठी करण्यात आला असून परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
४. सदर सामंजस्य करार एकमेकांच्या सहमतीने अथवा एकतर्फी पूर्व लेखी सूचनेनुसार संपुष्टात आणता येईल.
५. कार्यक्रमांच्या आयोजनाचा खर्च आयोजक संस्था करेल. कोणतीही आर्थिक देवघेव केली जाणार नाही.

**समन्वय आणि अंमलबजावणी**

सदर कराराचे पालन समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सातारा यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. महाविद्यालय स्तरावर प्राचार्य, मराठी विभागप्रमुख आणि समन्वयक हे काम पाहतील.

प्राचार्य रमणलाल शहा
अध्यक्ष
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
सातारा शाखा

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड
कार्याध्यक्ष
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
सातारा शाखा

श्री. ऋषिकेश सारडा
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
सातारा शाखा

प्रा. स्मिता कालभूषण
समन्वयक व सहा. प्रा. मराठी विभाग
आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे